




RNI NO-MAHMAR/2022/90217

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784









वर्ष ३ रे अंक : १६६ वा गुरूवार दि. १४ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# आरोग्य उपसंचालक भंडारी यांच्याशी त्यांची कमालीची सेटिंग!

## अकोल्यात व बुलढाण्यात गैरव्यवहार! पण ठोस कार्यवाही होईना!...











**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्हा रुग्णालयात कोरोना काळात औषधी साहित्य खरेदी प्रकरणात तर अकोल्यातील स्त्री रुग्णालयात मनुष्यबळ पुरवठ्यात प्रचंड भ्रष्टाचार करण्यात आला.याप्रकरणी सजग लोकांनी चौकशीचा ससेमिरा लावूनही,व लोकप्रतिनिधींनी दोन वेळा तारांकित प्रश्न उपस्थित केल्यानंतरही, कारवाई शून्य असल्याने आरोग्य उपसंचालक अकोला भंडारी यांच्याशी त्यांची कमालीची सेटिंग असल्याचे बोलल्या जात आहे. अकोला जिल्ह्यातील स्त्री रुग्णालयात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत एसएनसीयु विभागातील मनुष्यबळाचा पुरवठा निविदा प्रक्रियेत मोठा आर्थिक घोळ झाल्यानंतर याप्रकरणी सात सदस्य समितीकडून चौकशी पूर्ण करण्यात आली असून,अहवाल आरोग्य संचालकांकडे पाठविल्याची माहिती आहे.परंतु त्यांनी आरोपींना पाठीशी घातल्याची चर्चा सुरू आहे.असाच प्रकार बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात घडला आहे.याप्रकरणी दोषींना बगल देत, डॉ कमलेश भंडारी यांनी कर्तव्यात कसूर केल्याचे दिसून येत आहे. बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात कोव्हिड १९ काळात करोडो रुपयांचा साहित्य व मेडिसिन घोटाळा झाला. त्या प्रकरणात तत्कालीन जिल्हाशल्य चिकित्सक डॉ प्रेमकुमार पंडित, डॉ. नितीन तडस व बहुचर्चित भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम अकोला सह इतर यांची वेगवेगळ्या समिती गठीत होऊन चौकशी अंती यांच्यावर दोष सिद्ध होऊन नाममात्र कारवाई करण्यात आली. परंतु तक्रारकर्ते चंद्रकांत खरात व सिटी न्यूज दैनिक जनसंचलन यांनी पाठपुरावा सुरूच ठेवला व या संपूर्ण प्रकरणाची विभागीय चौकशी लावण्यात आली. समितीच्या अहवालात तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक नितीन तडस व भांडारपाल प्रकाश बोथे सह इतर यांच्यावर कारवाई करण्यात आली. बडतर्फ प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम अकोला यांची चल अचल संपत्ती जप्त करून त्वरित लिलाव करा व येणारी रक्कम शासन तिजोरीत जमा करण्याचे पत्र उपसंचालक अकोला डॉ. कमलेश भंडारी यांना २०२४ ला देऊन ही आज पर्यंत कुठलीच कारवाई केली नाही.या प्रकरणात त्यांना वेळोवेळी संपर्क करण्याचा प्रयत्न करीत असून ते कॉल उचलत नाहीत. उपसंचालक अकोला डॉ.कमलेश भंडारी व विभागीय चौकशी अहवालात दोषी भ्रष्टाचारी बडतर्फ भांडारपाल प्रकाश बोथे हल्ली मुक्काम अकोला यांची काय सेटिंग आहे ? याकडे आरोग्य मंत्री कर्तव्यदक्ष नामदार आबीटकर यांनी करोडो रुपये भ्रष्टाचार प्रकरणात लक्ष केंद्रित करून उच्चस्तरीय चौकशी करून दोषीकडून करोडो रुपयांची व्याजासह वसुली करून दोषींवर फोजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याचे निर्देश पोलीस प्रशासनाला द्यावी अशी मागणी जिल्ह्याभरातून होत आहे.

# व्याजखोराचा दहशतवाद डॉक्टर कुटुंबाला जिवंत जाळण्याची धमकी!

## दारूच्या नशेत घरात घुसून डॉक्टर पत्नीला मारहाण काच फोडली!

**जनसंचलन/मेहकर**

शहरातील नामांकित बी.ए.एम.एस. डॉक्टर अमोल शेळके यांच्यावर व्याजखोर सनी काशिनाथ सांगळे याने गेल्या दीड वर्षापासून सतत जीवघेण्या धमक्या, शिवीगाळ व मारहाणीचे थरारक प्रकार घडवले आहेत. डॉ. शेळके यांनी हॉस्पिटलसाठी २३ फेब्रुवारी २०२४ रोजी सांगळेकडून ३ लाख रुपये व्याजाने घेतले होते. परतफेडीमध्ये डिसेंबर २०२४ पर्यंत नगदी ३,१०,००० व फोनपेने २,१३,००० तसेच १७ महिन्यांतील ३,४०,००० असे एकूण ८,६३,००० रुपये दिल्याचा डॉक्टरांचा दावा आहे. तरीही सांगळे २० लाख रुपये व्याज बाकी असल्याचा खोटा आरोप करून धमक्या देत असल्याचे उघड झाले आहे. १९ मे रोजी घरात दारूच्या नशेत घुसून, ३ ऑगस्ट रोजी दवाखान्यात येऊन डॉक्टर व त्यांच्या पत्नीला शिवीगाळ, मारहाण, काच फोडणे व ५ हजार रुपयांचे नुकसान केल्याचा गंभीर आरोप आहे. एक महिन्यात पैसे न दिल्यास कुटुंबासह जीवंत जाळीनङ्गअशी धमकीही देण्यात आली. १२ ऑगस्ट रोजी पुन्हा मोबाईलवरून जीव मारण्याची धमकी मिळाल्याने



डॉक्टरांनी अखेर पोलिसात धाव घेतली. शेळके कुटुंब भीतीच्या छायेत असून, आरोपीविरुद्ध तातडीने कडक कारवाईची मागणी होत आहे.

# आमचं संगीत लताजींमुळे बहरलं!

## संपादकीय लेख

संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्यासाठी लता मंगेशकरांनी शेकडो गाणी गायली. चित्रपट संगीतातील आणि अभिरुचीतील अनेक बदल त्यांनी एकत्र पाहिले. लता मंगेशकरांबद्दलची आपली कृतज्ञता व्यक्त करत आहेत, ज्येष्ठ संगीतकार प्यारेलाल... आमच्या संगीत दिग्दर्शनाच्या कारकिर्दीत आमच्यासाठी लतादीदींनं भरभरून गाणी गायली, ही मी ईश्वरीकृपाच समजतो, लक्ष्मीकांत-प्यारेलाल या प्रसिद्ध संगीतकार जोडीतले प्यारेलाल शर्मा विनम्र स्वरात आपलं मत मांडत होते. मला सुरांची गोडी बालपणापासून निर्माण करणारे माझे वडील रामप्रसादजींच्याच जागी मी दीदींना माझ्या कुटुंबातीलच श्रेष्ठ मानतो, प्यारेलालजी सांगत होते- माझ्या वयाच्या दहाव्या वर्षी मी दीदींच्या रेडिओ क्लबमध्ये झालेल्या कार्यक्रमात मेंडोलीन वाजवलं. ते वादन दीदींना खूप आवडलं, हे माझं भाग्यच. मी आणि लक्ष्मीकांत आम्ही दोघांनी संगीत दिलेला पहिलाच चित्रपट होता बाबूभाई मिस्त्रींचा पारसमणी (१९६३). आम्ही नवोदित असूनही दीदी या चित्रपटासाठी गायल्या . हंसता हुआ नूरानी चेहरा या त्यातील गाण्यानं आमचं संगीत हिट झालं. आमचं बजेट फार नसतानाही दीदी गायल्यामुळे आमचा पहिलाच सिनेमाही संगीतकार म्हणून हिट झाला आणि पाठोपाठ दोस्तीतल्या गाण्यांमळे (चाहूँगा मैं तुझे, राही मनवा) आम्हाला फिल्मफेअर बेस्ट संगीतकार अॅवॉर्डही मिळालं. शंकर जयकिशन, मदन मोहन यांच्यासारख्या तत्कालीन नामवंतांच्या काळात लतादीदींसारख्या सुपरहिट आवाजाची साथ आम्हाला मिळाल्यानेच आमचं नाव झालं. त्या काळातील दीदींचे विशेष असे की, आम्ही नामवंत संगीतकारांकडे वादक म्हणून, अॅरेंजर म्हणून काम करत असताना, आमची तत्कालीन आर्थिक स्थिती लक्षात घेऊन, आमच्यातील (मी आणि लक्ष्मीकांत) वादन कौशल्य पाहून ते जाणवताच, लतादीदींनी आमच्यासाठी तत्कालीन नामवंतांना, संगीतकारांना वादक म्हणून आमची नावंही सुचवली, हा दीदींचा मोठेपणा! आमच्या पारसमणी या नमनाच्या चित्रपटासाठी त्या गायल्या, गाणी हिट झाली आणि कारकिर्दीचा आरंभच लतादीदींमुळे बहरला गेला. आमचा आत्मविश्वास वाढला. संपूर्ण मंगेशकर परिवारच आम्हाला घरातल्यासारखा वाटतो. सुरील कला केंद्रसारख्या मुलांसाठीच्या संगीत कला अकादमीत हृदयनाथ, उषाताई यांच्यासारख्या मंगेशकर कुटुंबियांसमवेत आम्हाला आमची संगीत कारकिर्दीची उमेदवारी करता आली. त्या काळात मी, म्हणजे प्यारेलाल रामप्रसाद शर्मा आणि लक्ष्मीकांत कुडाळकर आम्हा दोघांची नावं दीदींनीच नौशाद, सचिनदेव बर्मन, सी. रामचंद्र यांना सुचवली. आरंभी आम्ही दोघे एकत्र स्टुडिओत वाजवायचो. कल्याणजी-आनंदजींचे असिस्टंट होतो. माझे व्हायोलीन गुरू अँथनी गोन्सालवील्स यांची साथही मोलाची. अनेकांचे म्युझिक अॅरेंजर्स म्हणून काम करताना आमची आर.डी. बर्मन यांच्याशी ओळख झाली आणि आम्ही स्वतंत्र संगीतकार झाल्यावर आरडीनी आमच्यासाठी माऊथ ऑर्गनही वाजवला. आमच्या संगीतकार म्हणून १९६३ ते १९९८ या पस्तीस वर्षांच्या वाटचालीत दीदींच्या सुरावटींनी आम्हाला लोकप्रिय केल्यानेच राज, देव आनंद, बी. आर. चोप्रा, शक्ती सामंता, मदन मोहन, मनमोहन देसाई, यश चोप्रा, राज खोसला, सुभाष घई, के. विश्वनाथ, मनोज कुमार या नामवंत निर्मात्यांकडे काम मिळाले. छलियाँ मेरा नाम या गाण्यानं अॅरेंजर म्हणून नाव झालं आणि प्यार किये जा, दो रास्ते, खिलौना, अच्छा तो हम चलते है, डफलीवाले, जिंदगी हर कदम... अशी गाणी आणि या सिनेमांनी लोकप्रियता मिळून दिली. पं. शिवकुमार शर्मा, पं. हरीप्रसाद चौरासिया अशा वादकांची साथ मिळवत आम्ही संगीतकार म्हणून लोकप्रिय झालो. फर्ज, शागीर्द सारखे अनेक चित्रपट गोल्डन ज्युबिली हिट झाले. मिलनला फिल्मफेअर ट्रॉफीही मिळाली. गीतकार आनंद बक्षी यांच्याराबरोबर आमचे सूर जुळले आणि आम्ही जवळजवळ २५० फिल्म्ससाठी एकत्र काम केलं, त्यातून मोठा संगीतमय इतिहासच निर्माण झाला. या सर्व वाटचालीत दीदींचं गाणं आम्हाला उंचावत न्यायला कारणीभूत ठरलं. आम्ही इंडियन क्लासिकल, वेस्टर्न म्युझिक, फोक, डिस्को असे सारे प्रकार हाताळत असताना कॅब्रेसाठी दीदी फक्त आमच्याकडे गायल्या. सावन का महीना (मिलन), दिल विल प्यार व्यार (शागीर्द), कैसे रहू चूप (इंतकाम), जो मैं चली (जल बिन मछली), एक प्यार का नगमा है (शोर, मुकेश साथ), चाबी खो जाय (बॉबी), डफलीवाले (सरगम), तेरे मेरे बीच में (एक दुजे के लिये), यशोदा का नंदलाला (संजोग), मैं तेरी दुश्मन (नगीना) अशा अनेक गाण्यांत दीदींच्या सुरांनी लक्ष्मी-प्यारे आठवत राह्यले. लक्ष्मी-प्यारेंची संगीत कारकीर्द हिट होण्यात लता मंगेशकर यांची महत्वाची भूमिका आहे. पस्तीस वर्षांच्या आमच्या सुरेल वाटचालीत लता मंगेशकरांनी आमच्यासाठी ७१२ गाणी गाऊन मोठ्ठा वाटा उचललेला आहे. किती नावं घ्यावी आणि किती चित्रपट सांगावेत? सती सावित्री (१९६४), लुटेरा (१९६५), इंतकाम (१९६८), शराफत (१९७०), अभिनेत्री (१९७१), मेरा गांव मेरा देश (१९७१), जल बिन मछली, राजा जानी (१९०२), बॉबी (१९७३), सत्यम शिवम सुंदरम, एक दुजे के लिए....दिवस, महिने वर्षे जात राहिली आणि आम्ही सतत लोकप्रिय गाणी देत राहिलो. लता मंगेशकर या आवाजाला पेलवणार नाही अशी चालच नाही, उलट त्यांची क्षमता,त्यांच्या आवाजाची रेंज एवढी विलक्षण आहे की ती रेंज पाहून संगीतकारांनी अनेक प्रयोग केले. एरवी जी गाणी जन्माला आलीच नसती अशी शेकडो गाणी केवळ लता मंगेशकरांमुळे जन्माला आली आहेत. संगीत बदलत गेलं, लोकांची रुची बदलत गेली, परंतु अनेक वर्षे गाण्यांमध्ये लताजींचा स्वर मात्र कायम राहिला. आमच्या कारकिर्दीच्या अगदी अखेरच्या टप्प्यापर्यंत दीदींचा मोठ्ठा ठसा उमटलेला आहे. सुरांचं वैविध्य जोपासलेलं आहे. दो रास्ते, खलनायक, राम लखन, सौदागर यासाठी अनेक पुरस्कार मिळवले आहेत.




## देवदर्शनाला निघालेल्या महिलेला लुटले; एक लाखाचा ऐवज लंपास

जनसंचलन/ सिंदखेडराजा

देवदर्शनासाठी निघालेल्या महिलेला रस्त्यात अडवून जवळपास एक लाख रुपयांचे दागिने लंपास करणाऱ्या चोरट्यांचा अद्याप शोध लागलेला नाही. मात्र, या चोरट्यांनी वापरलेली कार पोलिसांनी जप्त केली असून, ती जालना जिल्ह्यातील बदनापूर येथून चोरल्याचे निष्पन्न झाले आहे. ही घटना मंगळवारी (दि. १२) सकाळी सहा वाजता शहरातील जालना रस्त्यावरील हेलिपॅडजवळ घडली. शिक्षक कॉलनीतील आश्राबाई लिंबाजी मुंढे (वय ५५) या मोठा महादेव मंदिरात दर्शनासाठी जात असताना, जालनाकडून आलेल्या एका कारमधील काही अज्ञात व्यक्तींनी खाली उतरून त्यांच्या गळ्यातील गंठण व कानातील कर्णफुले असा एकूण ९६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. या धक्कादायक घटनेत महिलेच्या कपड्यालाही फाट पडला. सकाळी साडेनऊच्या सुमारास स्थानिक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. सीसीटीव्ही फुटेज तपासून पोलिसांनी (एमएच ०१ बीबी ३४३८) क्रमांकाची कार शोधून काढली. किनगाव राजा पोलिसांच्या माहितीनुसार, ही कार दुसरबीडकडे न जाता सावखेड तेजन मार्गे वळविण्यात आली होती. पोलिसांनी त्या भागात शोधमोहीम राबवत चिंचोली येथे कार हेरली; मात्र चोरटे पसार झाले शोधाचा प्रयत्न सुरू आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# मुंबईत आज मुसळधार पावसाची शक्यता; कोकणासह या भागांत ॲलर्ट, काय सांगतो या अंदाज?



**मुंबई :** मुंबईत बुधवारी दिवसभर ढगाळ वातावरण होते आणि पावसाच्या हलक्या सरींनी उपस्थिती लावली. मात्र, आज, गुरुवारी महामुंबई परिसरात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. मुंबई , ठाणे, पालघर रायगड परिसराला गुरुवारसाठी यलो ॲलर्ट देण्यात आला आहे. या कालावधीत तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडू शकतो. तर वीकेंडलाही महामुंबईत हीच स्थिती कायम राहू शकते. भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, चंद्रपूर या जिल्ह्यांना ऑरेंज ॲलर्ट जारी केला आहे.दक्षिण कोकणात वीकेंडसाठी ऑरेंज ॲलर्ट देण्यात आला आहे. रायगडमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडू शकेल तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातही तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. बुधवारी मुंबईमध्ये पावसाळी वातावरणामुळे तापमानाचा दिलासा मिळाला. मंगळवारी कुलाबा येथे ३१.५, तर सांताक्रूझ येथेही ३१.५ अंश सेल्सिअस कमाल तापमान होते. बुधवारी यात घट होऊन कुलाबा येथे २८.८ तर सांताक्रूझ येथे २९.७ अंश से. कमाल तापमान नोंदवले गेले.शुक्रवार ते रविवार : ठाण्यात तुरळक ठिकाणी मुसळधार शनिवार, रविवार : मुंबईत मुसळधार शनिवार, रविवार : रायगड, रत्नागिरीत ऑरेंज अलर्ट रविवार : सिंधुदुर्गात तुरळक ठिकाणी मुसळधार पुणे, सातारा, कोल्हापूर: दोन दिवस ऑरेंज अलर्ट मराठवाडा आणि विदर्भ: पुढील तीन दिवस मेघगर्जनेसह मुसळधार अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ गुरुवारी ऑरेंज अलर्ट चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, भंडारा रविवारी ऑरेंज अलर्टआठवडाभरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जिल्ह्याच्या अनेक भागांत धुमाकूळ घातला आहे. या पावसामुळे बक्षी हिप्परगे गावासह अनेक भागात सर्वत्र पुलावर पाणी आल्यामुळे या गावांचा शहराशी असलेला संपर्क तुटलेला आहे. खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जिल्हा प्रशासनाने या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी मागणी दक्षिण सोलापूर तालुक्यातील बक्षी हिप्परगे गावचे सरपंच मनोज महाडिक यांनी केली आहे. गेल्या चार दिवसांत दक्षिण सोलापूर तालुक्याच्या अनेक भागांत मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. या पावसामुळे नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. अनेक गावांत नदी आणि ओढ्यांना पूर आला आहे.


# सरकारी तांदळाची आफ्रिकेत तस्करी; अंबादास दानवेंचा गंभीर आरोप, चौकशीची मागणी



**मुंबई :** राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सरकारी तांदळाची तस्करी सुरू असून जे. वी. ग्रेन्स डीलर्स या नोंदणीकृत संस्थेकडून हा तांदूळ दक्षिण आफ्रिकेला पाठवून तस्करी केली जात असल्याचा आरोप विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बुधवारी केला. या संदर्भात दानवे यांनी अन्न आणि नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांना पत्र लिहून या प्रकरणाच्या चौकशीची आणि दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.दानवे यांनी एक्स या समाज माध्यमातून तांदूळ घोटाळ्याचा गौप्यस्फोट केला. शालेय शिक्षण विभागाच्या संचालक (प्राथमिक) कार्यालयातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने ट्रस्टचे अध्यक्ष अनिलकुमार गुप्ता शालेय विद्यार्थ्यांसाठी वाटप होणारा तांदूळ परदेशात, विशेषतः आफ्रिकन देशांमध्ये तस्करी करत असल्याची आपली खात्रीशीर माहिती असल्याचे दानवे यांनी म्हटले आहे. जे. वी. ग्रेन्स डीलर्स ही नोंदणीकृत संस्था सामाजिक कार्यासाठी नोंदवली गेली. मात्र, या संस्थेला मुंबई जिल्ह्यातील तांदूळ वाहतुकीचे कंत्राट देण्यात आले आहे.या संस्थेला होणारा नफा सामाजिक उपक्रमासाठी वापरण्याऐवजी गुप्ता हे स्वतःच्या फायद्यासाठी वापरात असल्याचे समोर आले आहे. संस्थेत ८० टक्के भागधारक असलेले अनिलकुमार गुप्ता हेच तांदूळ वाहतुकीचे उपकंत्राटदार आहेत. यांना हे उपकंत्राट देताना नियम जात्यात दळून टाकण्यात आले, असा आरोप दानवे यांनी केला आहे. जे. बी. ग्रेन डीलर्सच्यावतीने कोणतेही सामाजिक काम झालेले नाही. ५ ऑक्टोबर २०२३ रोजी रेल्वे प्रशासनाने यांचे एक कंत्राट मुदतीपूर्वीच रद्द केले आणि अनामत रक्कम सुद्धा जप्त केली आहे. अशा संस्थेला कोणतेही टेंडर देता येत नाही. मग गुप्ता हे महायुती सरकारचे लाडके लाभार्थी कसे असा सवाल करत दानवे यांनी या प्रकरणाचे फॉरेन्सिक ऑडिट करून संस्थेची नोंदणी रद्द करण्यात यावी अशी मागणी केली आहे. तसेच टेंडर घोटाळ्यात दोषी आढळणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# मी अरुण गवळीचा पीए बोलतोय; बांधकाम व्यावसायिकाकडे ५ कोटींची खंडणी

**पुणे :** मी अरुण गवळीचा पीए बोलतोय, पाच कोटी दे‌असा धमकीचा फोन येताच एका बांधकाम व्यावसायिकाचे आयुष्य क्षणात अस्थिर झाले. परंतु गुन्हे शाखा आणि लष्कर पोलीस ठाण्याच्या संयुक्त कारवाईत ही खंडणीखोर टोळी अखेर जेरबंद झाली आहे. या प्रकरणी सुमित चौरे, रोहन गवारे, सुदर्शन गायके, महेंद्र शेळके आणि कृष्ण बुधनर अशी आरोपींची नावे असून, त्यापैकी तिघांना पोलिसांनी रंगेहाथ अटक केली आहे. हे आरोपी मूळचे बीड जिल्ह्याचे असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. या घटनेने पुण्यात एकच खळबळ माजली आहे.पुण्यातील ४९ वर्षीय बांधकाम व्यावसायिकाने पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, २०२२ मध्ये आरोपी सुमित चौरे यांच्यासोबत एका बांधकाम प्रकल्पासंदर्भात व्यवहार झाला होता. मात्र, तो बांधकाम प्रकल्प अनधिकृत ठरल्याने पुणे महापालिकेने तो पाडला आणि संपूर्ण प्रकरण हे न्यायालयात गेले. त्यानंतर २८ जुलै रोजी फिर्यादींना अज्ञात क्रमांकावरून फोन आला. यावेळी फोन करणारी समोरची व्यक्ती म्हणाली की, मी प्रशांत पाटील, अरुण गवळीचा पीए बोलत



आहे. त्यानंतर सुदर्शन गायके आणि त्याच्या साथीदारांनी वारंवार फोन करून ५ कोटी रुपये देऊन ‌मॅटरफ सेटल करण्याचा दबाव आणला, असा आरोप आहे.दरम्यान, ११ ऑगस्ट रोजी विमाननगर येथील एका हॉटेलमध्ये भेटायचं ठरवण्यात आलं होतं. तिथे सुदर्शन गायकेसोबत आलेल्या तिघांनी फिर्यादीला सरळ धमकी दिली, ‌ पाच कोटी दे नाहीतर तुझा जीव घेऊ.फ मात्र, पोलिसांनी आधीच सापळा रचला होता. योग्य क्षणी कारवाई करत तिन्ही आरोपींना घटनास्थळीच पकडण्यात आलं होतं.

या प्रकरणी आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०८ (३), ३०८ (४), ३५१ (३), ३५१ (४), ३५२, ६१ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून, उर्वरित आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितलं.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रायगडमध्ये काका मावशीने चिमुकलीला संपवलं, कारण...;

## १० महिन्यांनी प्रकरणाचा उलगडा, आरोपी गजाआड

**ठाणे:** नेरळ पोलीस ठाणे ४ वर्षीय मुलगी हरवली असल्याची मुलीच्या आत्याने दिलेल्या तक्रारी नुसार कल्याण कोळसेवाडी पोलिसांच्या तपासात सदर मुलीचा खुन झाल्याचे व तीच्या खुनामध्ये तीच्या सख्या काका व मावशी हात असल्याचे समोर आले असुन, सदर मृत ४ वर्षीय मुलीच्या मृतदेहाचे अवशेष हे नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील मौजे चिंचवली येथून हस्तगत करण्यात आले असून, काका मावशी ही कल्याण कोळसेवाडी पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.कल्याण कोळसेवाडी हद्दीतील राहाणारी एक महिला हि दुसऱ्या व्यक्ती सोबत विवाह करून राहत असल्याने, व तिचा पती हा कारागृहात असल्याने, त्या महिलेच्या दोन मुली या त्या महिलेच्या मामाकडे राहात होत्या. तर साधारण ऑगस्ट २०२४ मध्ये





दोन मुलींपैकी ४ वर्षीय लहान मुलगी ही कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील मौजे चिंचवली येथे राहाणाऱ्या मावशी अपर्णा प्रथमेश उर्फ आमर कांबरी तिच्या सोबत चिंचवली येथील राहात्या घरी आली होती. तर सदर मुलीची चौकशी व विचारपूस ही मुलीचा मामा व आत्या हे मुलीचे काका प्रथमेश उर्फ आमर प्रविण कांबरी यांच्या फोनवर फोन करून करत असे, मात्र दोन महिन्या नंतर सदर मुलीची चौकशी व विचारपूस करण्यासाठी फोन केला असता, मुलीचा काका हा मी बाहेर आहे. ती घरी आहे. अशा प्रकारची उत्तरे देत असल्याने, मुलीच्या मामा व अत्या व इतर नातेवाईकानी चिंचवली येथील मावशीच्या घरी गेले असता, घर बंद असल्याचे दिसून आले.याबाबत संशय निर्माण झाल्याने, त्यांनी मुलगी हरवल्याची असल्याची तक्रार ही कल्याण कोळसेवाडी पोलीस ठाण्यात ऑक्टोंबर २०२४ रोजी दाखल केली होती.

सदर तक्रारीनुसार कोळसेवाडी पोलीसांनी तपास सुरू केला असता, काका व मावशी हे चिंचवली येथील राहत्या घरातून फरार असल्याचे निष्पन्न झाले. त्या दोघांचा तपास सुरू केला असता, तब्बल १० महिन्यांनी प्रथम मावशीला कोळसेवाडी पोलीसांनी ताब्यात घेतले. फरार काका प्रथमेश कांबरी यांची चौकशी केली असता तिला मारल्याची व तिचा मृत्यू झाल्याचे कबुल केले. आरोपी काका याला मुलीचा मृतदेहा बद्दल विचारणा केली असता, चिंचवळी गावाचे हद्दीत कर्जत - कल्याण राज्य मार्गावच्या व शेजारी भाऊसाहेब राऊत विद्यालयाच्या शेजारील असलेल्या झाडीत टाकल्याचे सांगितले. ४वर्षीय मृत मुलीच्या मृतदेहाचे अवशेष हे कल्याण कोळसेवाडी पोलीसांनी आरोपी काकाने दाखवलेल्या घटनास्थावरून हस्तगत केले आहे. त्या लहान मुलीने एक, दोन वेळा शौच केल्याचा राग आल्याने मी तिला मारहाण केली. त्यामध्ये तिचा जिव गुदमरला होता. मी घाबरल्याने तिला डॉक्टरकडे नेले नाही व तिचा मृत्यू झाला तिचा मृतदेह हा मी माझी पत्नीने गादीमध्ये गुंडाळून रात्रीचे काळोखात कर्जत - कल्याण राज्य मार्गावरील भाऊसाहेब राऊत विद्यालयाच्या शेजारील असलेल्या झाडी मध्ये टाकल्याची कबुली ही आरोपी काका प्रथमेश कांबरी यांनी पोलिसांसमोर कबुली दिली.

# मला याच्यात अडकायचं नाहीये, या निकषांवरून कलाकाराचा दर्जा ठरत नाही... प्रियदर्शिनी इंदलकरचं वक्तव्य चर्चेत


यश-अपयशावरून तो कलाकार म्हणून कसा आहे, हे ठरत नाही, असं स्पष्ट म्हणणं आहे प्रियदर्शिनीचं. ती म्हणाली, प्रत्येक कलाकाराचा प्रवास वेगवेगळा असतो. काहींचा पहिला चित्रपट फार चालतो. पहिल्या चित्रपटातच एखादा कलाकार स्टार होतो. तर काही कलाकारांना १०० चित्रपटांनंतर घवघवीत यश मिळतं. किती चित्रपटांनंतर कलाकाराला यश मिळतं किंवा दिग्दर्शक, निर्माते कलाकाराच्या नावाचा विचार करतात का, या निकषांवरून कलाकाराचा दर्जा ठरत नाही. तसंच एका चित्रपटातून कलाकार चांगला की वाईट हेसुद्धा ठरत नसतं.मराठी मनोरंजनसृष्टीत आघाडीच्या अभिनेत्रींमध्ये प्रियदर्शिनी हिचं नाव आवर्जून घेतलं जातं. याबाबत ती म्हणाली, आघाडीच्या अभिनेत्रींच्या पहिल्या १० नावांमध्ये माझी गणना होत असल्यास मी समाधानी आहे. माझं नाव यादीत पहिलंच असावं, असा माझा अट्टहास नाही. मनोरंजनसृष्टीतलं काम ही एक मॅरेथॉन आहे. मीसुद्धा या मॅरेथॉनचा एक भाग आहे. प्रत्येक जण आपापल्या क्षमतेप्रमाणे धावतो आहे. मीसुद्धा पूर्ण ताकदीनं या मॅरेथॉनमध्ये धावण्याचा प्रयत्न करते आहे. ही मॅरेथॉन जिंकण्यापेक्षा त्यात टिकून राहणं महत्त्वाचं आहे.प्रियदर्शिनी हिनं गेल्या काही काळात निवडलेल्या कलाकृतींमध्ये तिनं स्वतःची छाप पाडली. तिच्या भूमिकानिवडीचंही कौतुक झालं. चित्रपट स्वीकारताना माझी प्रतिमा मुद्दाम जपण्याचा किंवा तोडण्याचा मी प्रयत्न करत नाही. मला चित्रपटांमधून वेगवेगळ्या



धाटणीच्या भूमिका साकारायच्या आहेत. एखादी भूमिका साकारताना त्यातलं आव्हान मला आकर्षित करतं. चाकोरीबद्ध कामात मला अडकायचं नाही, असं ती म्हणाली.अलीकडच्या काळात प्रियदर्शिनी हिच्या नावाचा अनेक निर्माते-दिग्दर्शक विचार करत आहेत. ही सुखावणारी बाब असल्याचं ती आवर्जून नमूद करते. याबाबत ती म्हणाली, सध्या मला अनेक चांगल्या प्रोजेक्ट्ससाठी विचारणा होत आहे. माझ्या नावाचा विचार चित्रपटकर्ते, निर्माते करत आहेत, याचा मला आनंद आहे. या वर्षी माझ्या अनेक चांगल्या कलाकृती प्रदर्शित होणार आहेत. त्यामुळे कामाच्या बाबतीत मी स्वतःला भाग्यवान मानते.मला चित्रपटांतून वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारायच्या आहेत. चाकोरीबद्ध कामात मला अडकायचं नाही.

# दहा वर्षांच्या संसारात फक्त छळ, सतत पैशांची मागणी; सहनशक्ती संपली, नागपुरात विवाहितेने जीव दिला...

**नागपूर :** आयुष्य संपवण्यापूर्वी संगीता शामराव बिसेन (वय ३२) या विवाहितेने लिहिलेल्या चिठ्ठीत आपला शारीरिक व मानसिक छळ झाल्याचे नमूद केले होते. त्यानुसार, तपास करीत वाठोडा पोलिसांनी तिचा पती शामराव बिसेन (वय ४२) याच्याविरुद्ध संगीता हिला जीव देण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. संगीताचा भाऊ अंकित खौशिज (वय २५, रा. छिंदवाडा, मध्य प्रदेश) याने दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. संगीता हिने २४ जुलै रोजी आपल्या आयुष्याची अखेर केली होती.संगीता हिचा विवाह एप्रिल २०१४ मध्ये शामरावसोबत झाला. विवाहापासूनच तिला गेली अनेक वर्षे शारीरिक आणि मानसिक छळ सहन करावा लागला. घर बांधल्यानंतर शामरावने संगीता आणि तिच्या कुटुंबीयांकडे सतत पैशांची मागणी करीत तिचा छळ केला. भावाकडून २ लाख रुपये मिळूनही शामरावचा छळ सुरूच राहिला. यामुळे संगीता ही निराश झाली होती. त्यातूनच



२४ जुलै रोजी दुपारी तिने वाठोडा येथील छोटी तरोडीतील वंदे कृष्णा सोसायटीतील घरी गळफास घेऊन आयुष्य संपवलं.तिने जीव देण्यापूर्वी लिहून ठेवलेल्या सुसाईड नोटमध्ये, पतीकडून होत असलेल्या सततच्या छळाचा उल्लेख केला आहे. माझ्या मृत्यूनंतर माझ्या मुलाला त्याच्या मामाच्या घरी जाण्याचेही नमूद केले आहे. सुरुवातीला अपघाती मृत्यू म्हणून नोंदवलेल्या या प्रकरणात अंकितच्या तक्रारीनंतर वेगळे वळण मिळाले. तक्रारीत शामरावने सतत छळ करून संगीताला स्वतःचं आयुष्य संपवण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# मुलीने १५ तोळे सोनं प्रियकराला दिलं, आईला धक्का; प्रियकर म्हणतो खाण्या-पिण्यात उडवले,

**छत्रपती संभाजीनगर :** आईने आयुष्यभर नोकरी करून कष्टाने पंधरा तोळे सोने जमवले. मात्र प्रेमात बुडालेल्या मुलीने कर्जबाजारी प्रियकरासाठी आईचे दागिने प्रियकरायला देऊन टाकेल. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी प्रियकराला ताब्यात घेतलं. सुरुवातीला उडवा-उडवीची उत्तर देणाऱ्या प्रियकराला पोलिसी खाक्या दाखवताच मुलीने दिलेलं सोन विकून पैसे खाण्या-पिण्यात उडवल्याची कबुली प्रियकराने दिली. याप्रकरणी मुलगी आणि प्रियकराविरुद्ध बेगमपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. मंगेश विलास पंडित, वय १९ रा.




बेगमपुरा असं आरोपी प्रियकराचं नाव आहे. याप्रकरणी ५८ वर्षीय महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, मुलगी आणि एका मुलासह महिला हडको परिसरात राहते. त्या नुकत्याच आरोग्य विभागातून सेवानिवृत्त झाल्या आहेत. दरम्यान ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन असल्याने मुलाने आईकडे सोन्याच्या अंगठीची मागणी केली. रक्षाबंधन असल्याने महिलेने कपाट उघडलं असता डब्यात ठेवलेलं सोन आढळून आलं नाही. त्यासोबत ठेवलेली एक लाख ५५ हजार रुपयांची रक्कम देखील लंपास होती. हा संपूर्ण प्रकार बघून महिलेला धक्का बसला. आईने मुलाला विचारला असता मुलाने माहित नसल्याच सांगितलं. आईने मुलीला विचारलं तर मुलीने सुरुवातीला उडवा-उडवीची उत्तरं दिली. मात्र आईला मुलीच्या बोलण्यात गोंधळ आढळला. त्यांनी मुलीला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता मुलीने सोनं घेतल्याची कबुली दिली. याप्रकरणी दोघांविरुद्ध बेगमपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मंगेशने प्रेयसीकडे पैशाची मागणी केल्यानंतर तिने घरातील दागिने आणि पैसे रुमालात बांधले. त्यानंतर रात्रीच्या वेळी बादलीमध्ये पैसे आणि सोनं ठेवून बादलीला दोरी बांधली. प्रियकर मंगेशला घराखाली बोलावून बादली खाली सोडून सगळं सोनं देऊन टाकलं. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस निरीक्षक मंगेश जगताप, पोलीस उपनिरीक्षक सचिन देशमुख यांनी तात्काळ आरोपी प्रियकर मंगेश याला ताब्यात घेतलं. सुरुवातीला उडवा-उडवीची उत्तरं देणाऱ्या मंगेशला पोलिसांनी पोलिस खाक्या दाखवताच त्याने कबुली दिली. मैत्रिणीने दिलेलं सगळं सोना विकून पैसे खाण्या-पिण्यात उडवल्याची कबुली त्याने पोलिसांना दिली आहे. मंगेशने सोनं नेमकं कुणाला विकलं? पैशांचं काय केलं याचा तपास बेगमपुरा पोलीस करत आहेत.

# स्लॅब टाकताना १४ मजुरांना विजेचा धक्का, अल्पवयीन मुलाचा तडफडून अंत; अकोल्यात हळहळ

**अकोला :** अकोल्याच्या तेल्हारा तालुक्यातील वडगाव रोठे येथील घराचे बांधकाम सुरु असताना स्लॅब टाकण्याचे काम सुरु करण्यात आले होते. हे काम करत असताना येथे असलेल्या १३ ते १४ मजुरांना विजेचा झटका लागल्याची घटना घडली. या घटनेत एका अल्पवयीन बांधकाम मजूर असलेल्या मुलाचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातल्या वडगाव रोठे गाव येथील रहिवासी वसंता बरिंगे यांच्या घरी स्लॅबचे काम सुरू होते. दरम्यान, काल मंगळवारी रात्री उशिरापर्यंत त्यांच्या घराच्या स्लॅबचे काम पूर्ण झालं होतं. बांधकाम आटोपल्यानंतर बांधकाम मिक्सर बाजूला नेत असताना अचानक मजुरांना विजेचा जोरदार शॉक लागला. या मिक्सरच्या विजेच्या सर्व्हिस वायरला स्पर्श झाल्यानं विजेचा झटका लागला. यात जवळपास १४ बांधकाम मजुरांना हा विजेचा धक्का बसला.बांधकाम सुरू असताना मजुरांना विजेचा शॉक लागल्याची घटना घडली असताना ओमप्रकाश केशवराव जांभळे (वय




१७) याचा या घटनेत मृत्यू झालेल्या बांधकाम कामगार मुलाचे नाव आहे. तो बुलढाणा जिल्ह्यातील वसाडी गावातील रहिवासी असल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकरणात तेल्हारा पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली आहे. तर ७ ते ८ जण किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर तेल्हाराच्या ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आला. घटनेत मृत मुलाच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मात्र, घटनेनंतर संबंधित बांधकाम ठेकेदार घटनास्थळावरून पसार झाला आहे. तेल्हारा पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या बांधकाम ठेकेदाराला अटक होते का? त्याच्यावर नेमकी पोलीस काय कारवाई करतात? हे पाहावं लागणार आहे. या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या मुलाच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीची मागणी केली जात आहे. आपल्या लेकराचा म्हणजे ओमप्रकाशचा मृतदेह पाहिल्यानंतप आई-वडिलांनी एकच हंबरडा फोडला. त्यांचे अश्रू राहून उपस्थितांचेही डोळे पाण्याने डबडबले.

# मुलीला परीक्षेसाठी सोडायला आले, बापावर काळाचा घाला, कंटेनरखाली चिरडल्याने हृदयद्रावक मृत्यू

**नागपूर :** मुलीच्या आयटीआयच्या परीक्षेसाठी सोबत आलेल्या पित्याचा अपघातात मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. नागपूरच्या हिंगणा तालुक्यातील डोंगरगाव येथे मंगळवारी सकाळी घडलेल्या भीषण अपघातात पित्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. भीसम दीनूराम शाहू, रा. गोपालनगर, कलमना, नागपूर असे ५० वर्षीय मृत व्यक्तीचे नाव आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, प्रियंका भीसम शाहू ही शासकीय तांत्रिक संस्थान, बर्डी येथे शिक्षण घेते. तिची परीक्षा मेघसाई प्रायव्हेट आयटीआय, डोंगरगाव येथे होती. मंगळवारी सकाळी वडील भीसम शाहू तिला परीक्षेला सोडण्यासाठी मोटारसायकलने डोंगरगाव येथे घेऊन आले. सकाळी दहा वाजता मुलीला परीक्षा हॉलवर सोडल्यानंतर ते रस्ता पार करण्यासाठी निघाले.याच वेळी भारती ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या मालकीचा अशोक लेलँड कंटेनर क्रमांक ४० ९८०० मोठ्या वेगाने त्या रस्त्यावरुन येत होता. कंटेनर चालकाने वेळेत वेग कमी न करता थेट शाहूंना जोरदार धडक दिली. यानंतर कंटेनरचं पुढील चाक त्यांच्या पायांवरुन गेलं. रस्त्याच्या



दुभाजकावर आदळून ते गंभीर जखमी झाले. त्यांचा डोक्याला आणि पायांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.परिसरातील नागरिकांनी तातडीने हिंगणा पोलिसांना अपघाताची माहिती दिली. पोलिस पथक त्वरित घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी कंटेनर चालकाला ताब्यात घेत वाहन जप्त केले. अपघातामुळे रस्त्यावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. या प्रकरणात हिंगणा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे. पोलिसांनी या घटनेचा तपास सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींच्या जबाबांच्या आधारे सुरु केला आहे. प्राथमिक तपासानुसार, कंटेनर भरधाव वेगाने जात होता. चालकाने पादचारी पाहूनही वाहनावर नियंत्रण ठेवलं नाही.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# प्रेयसीवर गोळ्या झाडल्या, आणखी चार-पाच मुलींना संपवण्याची धमकी, पोलिसांनी कुरव्यात गुंडाचा असा उतरवला माज..

**छत्रपती संभाजीनगर :** पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये एका कुख्यात गुंडाचा माज चांगलाच उतरवला आहे. प्रेयसीला गोळ्या झाडून या गुंडाने दहशत माजवण्याचा प्रयत्न केला होता. तसेच त्याने पोलिसांसमोर मोठी धमकी दिली होती. जेलमधून सुटल्यावर आणखी चार-पाच मुलांना मारणार, अशी धमकी त्याने पोलिसांसमोर दिली होती. त्यामुळे त्याची किती हिंमत वाढली आहे, याबाबत सर्वत्र चर्चा सुरु होती. अखेर पोलिसांनी या गुन्हेगाराचं मुंडन केलं आणि त्याची रस्त्यावर धींड काढली. पोलिसांनी या माध्यमातून त्याचा चांगलाच माज उतवला आहे.हर्सूल कारागृहातून सुटतात कुख्यात गुंडाने प्रेयसीवर गोळीबार केला. यात प्रेयसी जखमी झाली आहे. तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अटक



केल्यानंतर या गुंडाने पोलिसांसमोर धमकी दिली. जेलमधून सुटल्यानंतर आणखी चार-पाच मुलींना मारायचं आहे, अस तो म्हणत होता. दहशत माजवणाऱ्या या गुंडाची छत्रपती संभाजीनगरच्या पोलिसांनी त्याची दहशत असलेल्या किलेअर्क, बुडीलेन, कॅनॉट येथून धिंड काढत चांगलाच माज उतरवला. सय्यद फैजल (उर्फ तेजा) सय्यद एजाज असे गोळीबार केलेल्या कुख्यात गुन्हेगाराचे नाव आहे. तो किलेअर्क इथला रहिवासी आहे.या प्रकरणी अधिक माहिती अशी की, सय्यद फैजल उर्फ तेजा हा शहरातील कुख्यात गुन्हेगार आहे. त्याच्यावर बलात्कार, शस्त्रसाठा, ड्रग्स तस्करी यासारखे १५ पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. तो नुकताच हर्सूल कारागृहातून बाहेर आला आहे. दरम्यान सोमवार रात्री आठ वाजेच्या सुमारास तेजा हा बेगमपुरा परिसरात होता. बेगमपुरात त्याने नशेत दहशत वाजवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तो किलेअर्क परिसरात मैत्रिणीच्या घरात गेला.दोघांमध्ये काही कारणावरून वाद झाला. याचवेळी तेजाने थेट पिस्तूल काढत गोळीबार केला. गोळीबाराचा आवाज झाल्याने परिसरातील नागरिक धावून आले. पोलिसांनी आरोपीला अटक केली. दुसऱ्या दिवशी आरोपीने पोलिसांसमोर जेलमधून बाहेर आल्यानंतर आणखी चार-पाच मुलींना मारायचं आहे, असं म्हणत धमकी दिली. या घटनेनंतर माध्यमांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्हे उपस्थित केले. दरम्यान पोलिसांनी आज फैसल उर्फ तेजाची दहशत असलेल्या किल्ले अर्क, बुडीलेन, कॅनॉट परिसरात धिंड काढली. पोलिसांनी केलेल्या या कारवाईनंतर गुन्हेगारांवर वचक बसेल, अशी चर्चा शहरात सुरू होती. अशा गुंडांवर पोलिसांनी सातत्याने अशा कारवाई केल्या तर शहरातील गुन्हेगारी नष्ट होईल असं देखील बोलले जात आहे.

# सातपुडा बंगला का सोडला नाही? अखेर धनंजय मुंडे सगळंच बोलले

**बीड :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी राजीनामा देवून आता ४ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. पण त्यांनी अद्याप आपला शासकीय बंगला सोडलेला नाही. मुंडे यांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांना मलबार हिल येथील सातपुडा नावाचा शासकीय बंगला देण्यात आला होता. पण त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर हा बंगला त्यांनी सोडणं आवश्यक होतं. नियमानुसार, मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर किंवा मंत्रीपदावरुन पायउतार झाल्यानंतर १५ ते २० दिवसांत मंत्र्यांनी शासकीय निवासस्थान सोडणं आवश्यक असतं. पण धनंजय मुंडे यांनी तसं काही केलेलं नाही. याबाबत विविध चर्चांना उधाण आल्यानंतर आता धनंजय मुंडे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यानंतर मंत्रिमंडळातील एक जागा रिक्त झाली होती. विधानसभा निवडणुकीनंतर ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यामुळे ते नाराज असल्याची माहिती समोर आली होती. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांच्या जागेवर छगन भुजबळ यांना मंत्रिपदाची संधी देत त्यांची नाराजी दूर केली. असं असलं तरीही छगन भुजबळ हे गेल्या चार महिन्यांपासून शासकीय बंगल्याच्या प्रतिक्षेत आहेत. आता सरकारने आपल्याला एखादं लहान घर तरी द्यावं जेणेकरुन मी माझं काम करु शकेन, अशी भूमिका छगन भुजबळ यांनी मांडली आहे. यानंतर आता धनंजय मुंडेंनी भूमिका मांडली आहे.मुंबई



शहरातील सातपुडा हे शासकीय निवासस्थान मी रिक्त केले नसल्याबाबत माध्यमांमध्ये वेगवेगळ्या बातम्या येत आहेत. मुंबईतील माझी सदनिका सध्या राहण्या योग्य नसून, त्याठिकाणी दुरुस्तीचे काम सुरू आहे. शिवाय माझ्या लहान मुलीची शाळा याच भागात असून माझ्या विविध आजारांवरील उपचारार्थ देखील मला मुंबईत राहणे गरजेचे आहे. मात्र या परिसरात तातडीने भाड्याने घर मिळणे सध्या कठीण आहे, माझा शोध ही सुरु आहे. माझ्या सदनिकेचे काम पूर्ण होताच मी शासकीय निवासस्थान रिक्त करणार असून, तशी शासनाकडे विनंती केली आहेइइइ, अशी प्रतिक्रिया धनंजय मुंडे यांनी दिली आहे.धनंजय मुंडे यांनी याआधीदेखील आपली भूमिका मांडली होती. मुंडे यांना शासकीय बंगला न सोडल्याप्रकरणी प्रशासनाने लाखो रुपयांचा दंड आकारल्याची माहिती समोर आली होती. त्यावेळी मुंडे यांनी प्रकृतीचं कारण दिलं होतं. यानंतर आज मुंडे यांची सविस्तर प्रतिक्रिया समोर आली आहे.



# राहुल गांधीच्या जीवाला धोका प्रकरणात ट्विस्ट...

**पुणे:** काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या जीवाला धोका असल्याची लेखी माहिती त्यांच्या वकिलांनी पुण्यातील विशेष न्यायालयात दिली होती. पण आता या प्रकरणात नाट्यपूर्ण घडामोड घडली आहे. वकिलांनी दिलेली लेखी माहिती राहुल गांधी यांच्या परवानगीशिवाय न्यायालयाला देण्यात आलेली होती. त्यामुळे न्यायालयात दिलेली माहिती मागे घेतली जाणार आहे.राहुल गांधी यांच्या जीवाला धोका असल्याचं त्यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितलं होतं. त्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. पण हा अर्ज राहुल गांधी यांच्याशी सल्लामसलत न करता केला गेला होता. त्यामुळे आज दाखल करण्यात आलेला अर्ज उद्या मागे घेणार असल्याची माहिती गांधी यांचे वकील मिलिंद पवार यांनी दिली. आज दाखल केलेल्या अर्जाला माझे अशील राहुल गांधी यांनी तीव्र विरोध केला आहे. त्यांनी अर्जातील मजकुराबद्दल असहमती व्यक्त केलेली आहे. त्यामुळे अर्ज मागे घेणार असल्याचं पवार यांच्याकडून सांगण्यात आलं आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्हा कारागृहात रक्षाबंधन सण उत्साहात साजरा

**जनसंचलन/बुलडाणा**

कारागृहात नातेवाईकांपासून दूर असलेल्या बंद्यांना सणाची उणीव भासू नये, तसेच आनंदी आणि खेळीमेळीचे वातावरण निर्माण व्हावे, या उद्देशाने महिला सदस्यांनी सर्व बंद्यांना व कारागृह कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे करण्यात आले. अपर पोलीस महासंचालक तथा कारागृह सुधारसेवा डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली बुलडाणा जिल्हा कारागृहात विविध सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने धार्मिक, सामाजिक, मनोरंजनात्मक व समुपदेशपर उपक्रम राबविले जातात. रक्षाबंधन सणानिमित्त प्रजापिता ब्रम्हा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, बुलडाणा यांच्या वतीने कारागृहातील बंद्यांना राखी बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला. या प्रसंगी भाई रंजनीकांत व डॉ. लता बाहेकर यांनी बंद्यांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. तसेच उर्मिला दीदी, पुनम दीदी, सुशांत सुरुशे, सुषमा गवई, जयश्री इंगळे, अर्चना बोरले यांनी मार्गदर्शनपर विचार मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कारागृह अधीक्षक मेघा शंकर बाहेकर, उमेश नाईक (तुरुंगाधिकारी), दरेसिंग चव्हाण(सुभेदार), दिनेश डोंगरदिवे, राहुल जाधव, सचिन वाढे, विशाल राजगुरु, नितीन नरोटे व कारागृह शिपाई यांचे सहकार्य लाभले.

# पोलीस मुख्यालयात अवयव दान जनजागृती अभियान संपन्न

**जनसंचलन/बुलडाणा**

अंगदान जीवन संजीवनी अभियान अंतर्गत येथील पोलिस मुख्यालयाच्या कवायत मैदानात अवयव दान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक डॉ. लध्दड व त्यांची संपूर्ण टीमने अवयव दानाचे महत्त्व व प्रक्रिया संदर्भात जनजागृती केली. जनजागृती कार्यक्रमात कृत्रिम श्वसन पद्धत () प्रशिक्षण देण्यात आले. तसेच अवयव दानाचे महत्त्व, प्रक्रिया व सामाजिक बांधिलकीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. उपस्थितांना अंगदानाच्या माध्यमातून होणारे जीवदान व समाजातील या उपक्रमाची गरज यावरही प्रकाश टाकण्यात आला. याप्रसंगी पोलिस निरीक्षक श्री. पावरा, राखीव पोलिस निरीक्षक विकास तिडके, पोलिस निरीक्षक दिनकर गावीत, जि.वि.मा.अ. राजेश धुताडमल, डॉ. प्रवीण घोंगटे, डॉ. शिंदे(), नेत्र समुपदेशक योगेश शिरसाट, सौरव हिवाळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमास पोलिस कर्मचारी व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# शेलूद येथे शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची ३१ वी सभा संपन्न

**जनसंचलन/बुलडाणा**

येथील कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने आयोजित शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची ३१ वी सभा मौजे शेलूद येथे प्रगतशील शेतकरी स्वप्नील महाजन यांच्या शेतावर पार पडली. सभामध्ये शून्य मशागत तंत्रज्ञानाचे महत्व, जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांचे संवर्धन, पिक लागवड खर्चात बचत, जमिनीची धूप रोखणे आणि पर्यावरण संतुलन याविषयी शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. दीपक जोशी यांनी शून्य मशागत तंत्रज्ञानामुळे सेंद्रिय कर्ब वाढून शेती उत्पन्नात भर पडते, असे सांगितले. कार्यक्रमात खरीपातील कीड-रोग नियंत्रणावर शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद झाला व प्रक्षेत्र भेटही घेण्यात आली. यावेळी वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. अमोल झापे, उद्यानविद्या तज्ञ डॉ. अनिल तारू, कृषी हवामान तज्ञ मनेश यदुलवार, दीपक काका जोशी, श्याम गट्टाणी, डॉ. बी. आर. पाटील, माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ कापूस संशोधन, तसेच इतर मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मनेश यदुलवार यांनी केले.

# कोर्टाचा आदेश फिर भी खाली हात!...

## पोलीस, महसूल अधिकाऱ्यांवर नामुष्की ओढवली!

**जनसंचलन/ चिखली**



न्यायालयाच्या आदेशाने शेतीचा चतुर्सिमा ताबा देण्यासाठी गेलेले पोलीस व महसूल कर्मचारी रिकाम्या हाताने परतले, त्यामुळे त्यांच्यावर नामुष्की ओढवली आहे. बुलढाणा जिल्ह्याच्या चिखली तालुक्यातील कोलोरी येथील दोन शेतकऱ्यांच्या वादानंतर निकाल लागेपर्यंत शासनाच्या ताब्यात असलेल्या जमिनीचा चतुर्सिमा ताबा हा लीलावधारकाला देण्यात यावा असा आदेश न्यायालयाने दिला आहे. त्यासाठी पोलीस बंदोबस्त ही देण्यात आला. मात्र घटनास्थळावर पोचल्यानंतर मंडळ अधिकारी झिने यांना दोन गट क्रमांक मध्ये संभ्रम निर्माण झाला, शिवाय याच प्रकरणातील एका महिलेने गळफास लावून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे केवळ मंडळ अधिकारी झिने यांच्या गलथान कारभारामुळे कुठलीही कारवाई न करता पोलिसांच्या फौज फाट्यासह महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना नामुष्की ओढवून रिकाम्या हाताने परतावे लागले आहे


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणुकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक पराग नवलकर यांचे आवाहन..

## स्वातंत्र्यदिनी ऑपरेशन सिंदुर सन्मान महारक्तदान शिबिरात सहभागी व्हा! -१००० पेक्षा जास्त पिशव्यांचे होणार रक्त संकलन!

जनसंचलन/बुलढाणा

राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि देशी-विदेशी लिकर असोसिएशन, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १५ ऑगस्ट रोजी ङ्कङ्कऑपरेशन सिंदुर सन्मानफ्फ महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सहकार विद्यामंदिर हॉल, बुलढाणा येथे सकाळी ९.३० ते ५ या वेळेत होणार आहे. या रक्तदान शिबिरात बुलढाणा वासियांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदान करावे, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक पराग नवलकर यांनी केले आहे. रक्तसंकलनाची जबाबदारी शासकीय रक्तपेढी बुलढाणा, शेगाव, खामगाव, लिलावती रक्तपेढी बुलढाणा, जनकल्याण रक्तपेढी नांदुरा, दत्ताजी भाले रक्तपेढी छत्रपती संभाजीनगर, आणि डॉ. हेडगेवार रक्तपेढी अकोला या संस्थांकडे असेल. १००० पेक्षा जास्त रक्त पिशव्यांचे रक्त संकलन होण्याची शक्यता असल्याचे नवलकर यांनी सांगितले.




कार्यक्रमास जिल्ह्याचे मान्यवर अधिकारी उपस्थित राहणार असून, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, तसेच इतर वरिष्ठ अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व संस्था प्रतिनिधी उपस्थित राहणार असून नागरिकांनी समाजसेवेचा संदेश देत महारक्तदान शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग नवलकर यांनी केले आहे.

# आवाज वाढवू नको डीजे,तुला आईची शपथ आहे!

## गणेशोत्सवासह इतर मिरवणुकी मध्ये डीजे बंदी, न वाजवण्याची शपथ, शेगावातील मंडळांना मिळणार ५१ हजाराचे बक्षीस!

जनसंचलन/ शेगाव

डीजेवर अनेक वेळा बंदी आणली गेली. परंतू लोकप्रतिनिधींच्या दबावापोटी पोलीस प्रशासन हतबल झाले आणि डीजेचा कर्णकर्कश आवाज मिरवणूक व जल्लोष यात्रेत ऐकायला मिळाला. अलीकडच्या काळामध्ये डीजेची क्रेझ आहे. अगदी लहान मोठे समारंभ, लग्न व मिरवणूक असो, यात मोठ्याने आवाज करणारे डीजे आवर्जून लावले जातात. मात्र डीजे वाजविल्याशिवाय देखील समारंभ पार पडू शकतो, या विचारातून शेगावमध्ये अगदीगणेशोत्सवासहकोणत्याही मिरवणुकीत डीजे न लावण्याची शपथ घेत डीजे बंदी करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे शहरातील मोतीबाग तालीम नागरी हक्क संरक्षण समिती व इतर सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने विविध पुरस्कारांची




घोषणा बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये करण्यात आली. लग्न समारंभ, वाढदिवस, मिरवणुकांमध्ये डीजे लावण्याचे फॅड सध्या वाढले आहे. मात्र या कर्ककर्कश आवाजामुळे अनेकांना विविध आजार जडले आहेत. तर दुसरीकडे टाळ मृदंग, सनई चौघडा ही परंपरा देखील लोप पावत चालली आहे. याचाच विचार करून बुलढाणा जिल्ह्याच्या शेगाव शहरातील मोतीबाग तालीम आणि नागरी हक्क संरक्षण समितीच्या वतीने पुढाकार घेतला आहे. या पुढाकारातून गणेश उत्सव असो किंवा इतर मिरवणुकींमध्ये डीजे न वापरण्याची शपथ घेतली आहे. अर्थात डीजे वाजविण्यावर एक प्रकारे बंदी घालण्यात आली आहे.डीजे न वाजविण्याबाबत शपथ घेण्यासोबत मिरवणुकांमध्ये सामाजिक प्रबोधन करणाऱ्या मंडळांना गणराया पुरस्कार देण्यात येणार असून या पुरस्काराची रक्कम ५१ हजारांची आहे. याशिवाय सिद्धिविनायक पुरस्कार ११ हजार रुपये देण्याचे मोतीबाग तालीम आणि नागरी हक्क संरक्षण समितीच्यावतीनेजाहीर केले आहे. तर जिल्ह्यातील इतर शहरांमध्ये देखील डीजे बंदी संदर्भात निर्णय घ्यावा; अशी अपेक्षा देखील यावेळी व्यक्त करण्यात आली.


# बुलढाणा ग्रामीण देशभक्त नागरिकांच्या वतीने तिरंगा पदयात्रा उत्साहात संपन्न!

जनसंचलन/बुलढाणा

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवाची जय्यत तयारी सर्वत्र सुरू असून देशभर विविध ठिकाणी हर घर तिरंगा, स्वच्छता अभियान, तिरंगा पदयात्रा काढून देशभक्त नागरिक स्वातंत्र्याच्या उत्सवात उत्साहाने सहभागी होतांना दिसत आहेत. यानिमित्ताने देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणाऱ्या व प्रसंगी आपल्या प्राणाचे बलिदान देणाऱ्या असंख्य क्रांतिकारकांना अभिवादन करण्यासाठी त्यातून त्यांच्या त्यागाचे, बलिदानाचे स्मरण करण्यासाठी त्याचप्रमाणे आजही देशाच्या सीमांचे संरक्षण करून मोठ्या कष्टाने मिळालेले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी रात्रं दिवस डोळ्यात तेल घालून भारतीय सैन्याने गाजवलेल्या सर्वोच्च पराक्रमाला नमन करण्यासाठी भारतीय सैन्याचे धन्यवाद, आभार मानण्यासाठी बुलढाणा ग्रामीण मधील नागरिकांनी भव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजन करून आपली देशभक्ती जिवंत असल्याचे दाखवून दिले. भारत माता की जय, वंदे मातरम्, जय हिंद सारख्या घोषणांनी तिरंगा पदयात्रा मार्ग परिसर दणाणून गेला होता. या तिरंगा पदयात्रेने अनेकानेक सर्वसामान्यांच्या मनामनात ज्वाजल्य देशभक्तीचे नवचैतन्य फुलविण्याचे काम केले. सर्वसामान्यांनी या तिरंगा पदयात्रेचे उत्स्फूर्तपणे स्वागत करत आनंद व्यक्त केला तर मातोश्री अर्बन चे अध्यक्ष संदीप पंडित व त्यांच्या सहकाऱ्यांनी पदयात्रेतील सहभागी देशभक्त नागरिकांना नाश्ता फराळाचे वाटप करून आपले सेवाकर्तव्य पार पाडले. या तिरंगा पदयात्रेची सुरुवात ही सागवन येथील पाळणाघर परिसर येथून झाली व नंतर पुढे तुळशी




नगर - समता नगर - एचडीएफसी चौक - आयसीआयसीआय बँक चौक - एलआयसी ऑफिस मार्गे पुढे बुलढाणा येथील हुतात्मा गोरे स्मारक येथे पोहचून पदयात्रेतील सहभागी नागरिकांनी हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र वाहून देशाच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या अनेक शूर वीरांच्या स्मृतींना वंदन करून आदरांजली वाहिली. या देशभक्तीपर तिरंगा पदयात्रेत बुलढाणा ग्रामीण मधील दीपक वारे, सतिश भाकरे पाटील, विनायक भाग्यवंत, दशरथसिंग राजपूत, डॉ.मधुसूदन सावळे, सतिश देहाडराय, सुरेश पाटील, राजेंद्र पवार, प्रीतीताई खंडारे, उषाताई पवार, प्रतीक गायकवाड, अमोल पडोळ, सतिश उबाळे, सारंगधर एकडे, शरद एकडे, राजू पाठक, प्रकाश राजगुरे, संजय साखरे, सारंग सुरुशे, विश्वनाथ घोडके, माजी सैनिक एकनाथ सातव, इंडियन आर्मी रविनाथ शेळके, सुधाकर वानेरे, अभिषेक मोहिते, विठ्ठल निकम, गणेश काटकर, सुहास राठोड, विजय तोमर, सचिन सूर्यवंशी, अशोक वाकोडे, विजय दिपके, प्रशांत बोरसे, विजय हिवाळकर, रामू पैठणे, विनोद भाकरे, नंदू शिंदे, सागर पाटील, साहेबराव शेळके, गजानन राजगुरे यांच्यासह इतर अनेक देशभक्त नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.




आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८